ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी

प्रा. डॉ. सुधीर भगत,
सहयोगी प्राध्यापक,
मराठी विभाग प्रमुख भगवंतराव कला व विज्ञान
महाविद्यालय एटापल्ली. जिल्हा गडचिरोली

1960 नंतर मराठी कवितेत मूलभूत असे परिवर्तन होऊन कवितेचे एक नवीन युग सुरू झाले. याच काळातील एक महत्वाचे कवी म्हणजे वसंत आबाजी डहाके पारंपरिक कवितेपेक्षा वेगळी व समर्थ अशी कविता त्यांनी लिहली.त्यामुळे समकालीन मराठी कवितेला वेगळी दिशा देणारे कवी म्हणुन त्यांचे काव्यकर्तूत्व उठून दिसते.

कवितेत प्रतिमांचा उपयोग प्राचिन काळापासून तर आज पर्यंत केलेला दिसतो. प्रतिमा ही ललित साहित्यातील एक महत्वपूर्ण घटक असल्यामुळे प्रतिमेमुळे कवितेत अत्यंत महत्व आहे. प्रतिमेच्या नवकाव्यापासून मराठी कवितेत प्रतिमाचा वापर हा जास्त प्रमाणात सुरू झाला. बा.सी. मर्ढेकरांच्या मते ज्याक्षणी नविन प्रभावी प्रतिमा सृष्टी काव्यात द्रष्टोत्पतीस येते. त्या क्षणाला काव्याचे एक युग संपून दूसरे सुरू झाल्याचे साक्ष पटते त्यांच्या द्रष्टीने नवीन प्रतिमा स्रष्टी म्हणजे नविन भावना निष्ठ समानता होय. त्यामुळेच प्रतिमेलाच कवितेचा मुख्य गाभा समजला जातो. प्रतिमेमुळे कविता श्रेष्ठ समजल्या जाते. इतके महत्व प्रतिमेचे कवितेत असते.

मराठी कवितेत प्रतिमेचे महत्व अनन्यसाधारण आहे. प्रतिमा ही कवितेची प्रधान घटक मानल्या जाते. प्रतिमेच्या माध्यमातून विचाराची समर्थपणे अभिव्यक्ती केली जाते. त्यामुळै आपल्या मनातील विचार, कल्पना, भावना, संवेदना हे एकत्रीतपणे मनातील भाव कळत न कळत प्रतिमेच्या द्वारे समोर येते.

वसंत आबाजी डहाके यांचे योगभष्ट्र ,शुभ वर्तमान, शुनःशेप व चित्रलिपी हे एकुण चार कवितासंग्रह. कवितेतील प्रतिमा सामर्थ्यामुळे साठोतरी काव्यात एक वेगळा ठसा त्यांनी उमठविला आहे. अपूर्व प्रतिमाची श्रीमंत असलेले कवितासंग्रह.या चारही कवितासंग्रहात व्यापक प्रमाणात प्रतिमाचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे कवींच्या समग्र कवितेचे आकलन करून होण्यासाठी त्यांची प्रतिमासृष्टी अत्यंत महत्वाची आहे.

कविता ही प्रतिमांमुळे आकाराला येते. कवितेला एक लावण्य प्राप्त होते. कवितेत प्रतिमा नसेल तर काव्य निर्मिती अशक्य आहे.त्यामुळे प्रतिमांच्या उपयोग काव्यात असने अपरिहार्य असुन प्रतिमा काव्याचे महत्वाचे अंग आहे. पउंहमे या संज्ञेसाठी मराठीत पर्याय म्हणुन प्रतिमा ही संज्ञा वापरली जाते. प्रतिमा म्हणजे प्रतिबिंब. कल्पनेतील स्मृतीतील चित्र प्रतिमा म्हणजे प्रतिबिंब.कल्पनेतील स्मृतीतील चित्र म्हणजे प्रतिमा. ''कल्पनेच्या पातळीवर इंद्रियगोचर होऊ शकणारा व जाणीवने भारलेला कवितेचा प्राथमिक घटक म्हणजे प्रतिमा'' हि गो.वि.करंदिकरानी केलेली काव्यातील प्रतिमेबाबतची अतिश्य महत्वाची आहे. प्रतिमा घडविणे हे कल्पना शक्तीचे कार्य असल्यामुळे कवी हा जितका प्रतिभावंत असेल तितक्या प्रतिमा हया सामर्थ्य संपन्न होते.

डहाके यांच्या कतिवतेत विपुल प्रमाणात प्रतिमा आहेत.कवी हा आपल्या विचारांची ,अनुभवाची अभिव्यक्ती प्रतिमांच्या व्दारे करीत असतो. त्यामुळे डहाके यांनी आपला आशय कवितेतील प्रतिमातुन अतिशय ताकदिने व्यक्त केला आहे. रूढ प्रतिमा सृष्टीची चौकट मोडुन नव्या युगाचा नवा संदर्भ असलेल्या नवनवे अर्थछटा घेउन त्यांची प्रतिमा येते.व मानवी जीवनातील वास्तवता त्यांच्या कवितेतील टिपते. ते स्वताःच कवितेतील प्रतिमेबाबत कविते विषयी या ग्रंथातात म्हणतात 'प्रतिमा म्हणजे एखादया पदार्थाचे दृश्य प्रकटीकरण, आरश्यातले प्रतिबिंब किंवा छाया चित्रकलेने निर्माण केलेली प्रतिमा दोन वस्तु मध्ये एक दुसऱ्याची प्रतिमा कल्पना अथवा स्मृती यांनी मनात काढलेले चित्र म्हणजे प्रतिमा' मुळ अनुभूतिचे प्रतिमेच्या व्दारे घळविलेले भाशिक दर्षन होय. प्रतिमांच्या स्वतंत्र पध्तीने अभ्यास करावा इतकी संपन्न अशी प्रतिमासृष्टी आहे.

डहाके यांच्या योगभष्ट्र, शुभ वर्तमान ,शुनःशेप व चित्रलिपी या चारही कविता संग्रहात प्रेमभावना, परात्मता, स्वनिर्भत्सना, भयाकुलता, महानगरीय संवेदना इ.जीवन विषयक घटनाचा वेध घेताना सुचक अश्या प्रतिमांचा वापर करतांना कवी दिसतात. मराठी कवितेत अनोळखी, स्वतंत्र, अशी प्रतिमाची रेलचेल दिसून येते.

सुर्याची कोमल त्वचा', 'माझ्या मनाचा सरडा', 'इमारतीची छिनाल पिवळी बुबुळ','जंगली बैलासारखा चंद्र','चाम खिळयासारखी निर्हेतुक विद्यापीठ','कुंकवाचा सूर्य', 'सुरकुत्या पडलेली रबरी ढुंगन', 'पिवळा उदास काळसर उजेड', 'म्हातारे शहर','कागदी माणस','यातनाचे कारंजे','मन त्रासलेल पाळलेल

कुत्र जसं','जुन्या गंजलेल्या लोखंडासारखा काळ','जीभेवर वेडसर शांतता','चुगलखोर खिडक्या', 'कोवळ उन आईच्या बोटासारख','ह्रदयाच्या सुनसान चौकात','डोक्याच्या अंगणात','नदीच्या सुकलेल्या पात्रासारख मन','जिभाची सोंग','मेंदूच्या खिडकीत','पांढरा कागद गोल कापून चिकटवल्यासारखा सूर्य','कानात बोळे घातलेले घर','गॅसबत्यांच्या घायाळ उजेड','एखाद्या रानबैलासारखा मोजलेला काळ','प्रश्नाचा भुंगा',' झुंबरासारखे महानगर','भाषा तोतरी',' बुरशी आलेले सांकेतीक शब्द','विचाराचा शुष्क कडबा','शब्दाची वाफ','आकाश मळकट चिंधीसारख','सुन्यासारख नजर','जमिनीत डोळा उघडावा तशी विहीर','गंजलेल्या शब्दाचा कुलुप'. नश्वर ढुंगण, ताणलेली रबरी चेहरे, बंडखोर रक्त, मुंडक्याचे मिनार, लंगड गाढव, म्हातारे शहर, जखमी प्रकाश, गारगोटी सारखे कठोर डोळै, रस्त्यावर टाकून दिलेल्या मुलासारखा देश, बी नसलेले रसयुक्त फळ, अनाथ पाखरं, अफुसारखी रात्र, रोगग्रस्त झाड, आक्रमक लांडगे, थकलेले पावलं, साकाळलेला आंधार, मोडून पडलेला जबडा, मुस्क्या बांधलेला प्रेक्षक वांद , कोरे कागद, जमिनीतून वर उचलेला चेहरा, काळजाचे पाणि, थकव्यांचा आभाळ, समुद्राचा कोमल हात, करवतीसारखे हात, लाकडी दैवतासारखा तडा गेलेला चेहरा, दगडी चेहरे, बुबुळ नसलेला डोळा, विसराळू संस्कार, नापिक पुथ्वी, सुरकत्या पडलेले पाणि.

सुर्य ही एकच प्रतिमा अनेक अर्थाने आली आहे. कवितेत त्याचा उपयोग अतिशय नाविन्यपूर्ण पध्दतीने केला आहे. सुर्याची कोमल त्वचा, कुंकवाचा सुर्य, सुर्यफुलाप्रमाणे आयुष्य, टांगलेला पांढरा सुर्य, पांढरा कागद गोल कापून चिकटवल्या सारखा सुर्य, जळजळता सुर्य, अस्ताव्यस्त सुर्य, तळपता सुर्य, फाटलेला सुर्य, हाडाच्या सांगाडयातील ओसाड सुर्यदेव, काळाभोर सुर्य, मस्तकातल्या सुर्याच्या ज्वाळा, सुर्य एखादया अधु पायाच्या घोडयासारखा काळा सुर्य, खिन्न उदास सुर्य, सुर्यांचा गिधाडी डोळा, झळझळता सुर्य, सुर्यांच्या वेगवेगळया प्रतिमा त्यांचे वेगळेपण याचे यातून दर्शन घडते. ही आगळी वेगळी प्रतिमा सृष्टीला त्यांनी दिली आहे.

डहाके यांनी आपल्या विचारांची अभिव्यक्ती वेगवेगळया प्रतिमाव्दारे केली आहे.अस्तित्ववादी विचारांचा प्रभाव त्यामुळे कवितेत प्रतिमेला नवीनता आली आहे.कवितेत येणाऱ्या प्रतिमा हया कविचा खास अनुभव असून त्यांच्या चिंतनशील मनाचे दर्शन घडविते.

मनुष्य पिंजण्याचं यंत्र हातात घेतलेली ही माणंस बिनसरकीच्या कापसासारखं ज्यांच आयुष्य...मानवी आकाराच लाकडी फर्निचर कुजायला आलेत सभ्यतेचे कुजलेल अलंकार. (योगभष्ट्र.पृ. 112)

तू आहेस माझी झोप,माझ्या जळत्या डोळयाची शांती
माझ त्रस्त मस्तक सोपवल आहे ती पाण्यासारखी
नितळ अणि उबदार मांडीतु आहेस
माझ्या ताणलेल्या नसांसाठी कोवळा स्पर्श
(शुभवर्तमान पृ.43)

जिथ सगळ सत्य फुलांसारख कोमल असंत आणि
पहाटेच्या उजेडासारखं निर्मळ शब्दाचे निखारे ओंजळीत

घेउन मी केली परिक्रमा निरर्थक
(शृनःशेप पृ.83

डहाके यांची कविता नजरेत भरते ती त्यांच्या प्रतिमा सृष्टीमुळे कविता वाचल्यानंतर तिचे वेगळेपण जाणविल्या शिवाय राहत नाही.ती जीवनाच्या सर्व बाजु धुंडाळताना दिसते. त्यामुळे हया प्रतिमा कविंच्या चिंतनशील मनाचे दर्शन घडविते. डहाके यांच्या कवितेतील प्रतिमेबाबत समीक्षक म.सु.पाटील म्हणतात,'' त्यांच्या कवितेत ठणकणाऱ्या जखमा, रोग, वणवा, ओघणारे रक्त, सडलेल प्रेत, संस्कृतीची कलेवंर शतकाचे सांगाडे, काळया रात्री,थंड काळोख,सून रस्ते, भुल्या वारा, सुर्याची पांढरी शुष्क हाडं अश्या प्रतिमांची गर्दी झालेली दिसते.त्यातून या कवींच्या काव्यात्म अनुभवाचा सूर सतत धुमसत राहतो. तो रसिकाना झपाटुन टाकतो आणि ही वेदना एकटया कवीची नसुन ती युगवेदना आहे याची प्रचीती देतो. ''विदारक सत्य सांगताना भेदक अश्या प्रतिमेच्या कवितेत उपयोग केला आहे. तर अक्षय कुमार काळे म्हणतात''डहाकेची प्रतिमासृष्टी वास्तवादी परंपरेतील नसुन दृकप्रतेवादी परंपरेतील आहे. निसर्गातील वस्तु जातीचे मुळ रुप कविच्या छिन्न मनस्क व्यक्तीत्वामुळे कमालीचे विरुप होउन वेगळाच प्रत्येय कविला देते स्वाभाविकच प्रतीमासृश्टी बदलते जिवनातील आत्मप्रत्याचा पातळीवर आलेला वैताग कोडमारा निराषा इत्यादी विविध सवेंधना घटकाचे वेगळया पध्दतीनें पुर्ण घटन करणे या मुळे कविला शक्य झाले गद्यातील अर्थात रन्यासाला पेलुन धरनारी आणि समकालीन कवितेत उठुन दिसनारी त्याची प्रतीमा अस्तीत्ववादी जानीवांचा संस्कार स्वीकारते'' कविनी विविध प्रतीमांचा उपयोग मानवी अवस्थाशी जोडला आहे अस्तीत्ववादी विचारांचा प्रभाव त्याच्यावरती असल्यामुळे नविन प्रतीमा भाशा आगळी वेगळी प्रतीमा सृश्टी दिसुन येते

साठोत्तरी मराठी कवितेला वसंत आबाजी डहाके यांनी एक नवीन प्रभावी अशी प्रतिमा सृष्टी दिली आहे. कविते मध्ये प्रतिमा निर्मितीला अन्यय साधारण महत्व असते. डहाके यांनी प्रत्येक कवितेमध्ये प्रतिमाचे वेगवेगळे प्रयोग केले आहे.त्यांची एकुणच कवितेतील प्रतिमा सृष्टी जीवना भिमुख असल्यामुळे एक व्यापकता

त्यांच्या कवितेला लाभली आहे. त्यामुळे मराठी कवितेचे सामर्थ्य व परिघ निश्चितच मोठा झाला आहे.

**निष्कर्ष** –

1) प्रतिमासृष्टी स्वतंत्र,नवीन व अतिशय समृदध आहे.
2) प्रतिमासृष्टीला मानवी जीवनाचा व्यापक संदर्भ आहे.
3) डहाके यांनी आपला आशय समथपणे प्रतिमातून व्यक्त केला आहे.
4) प्रतिमाची कवितेत रेलचेल असली तरी त्या नवनवीन आहेत.
5) अस्तित्ववादी विचारांचा प्रभावामुळे प्रतिमेच्या आशयात वेगळेपणा.
6) प्रतीमा मानवी जिवनाचा वितारक अनुभव व्यक्त करते.
7. वैचारिक पिळ असलेल्या चिंतन गर्भ प्रतिमा.
8. प्रत्येक प्रतिमेमध्ये एक गंभीर विचार आहेत्र
9. प्रतिकात्मक मितकाच्या प्रतिमेकडे जास्त लक्ष.
10. कवितेत प्रतिमांचा कलात्मक उपयोग.

***संदर्भ*** –

*1) म.सु.पाटील – कवितारती (संपा.)पुरूषोत्तम पाटील वर्ष 18 वे अंक 4 था, मे, जुन 2003.*
*2) रविंद्र घवी – प्रदक्षिणा खंड दूसरा कांटीनेंटल प्रकाशन पुणे 1998*
*3) अक्षयकुमार काळे – अर्वाचीन मराठी काव्यदर्शन बनहटटी प्रकाशन नागपूर 1999*
*4) सुधीर रसाळ – कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन मुंबई जुन 1982*
*5) रविंद्र मनोहर अस्तित्ववाद भारत मुद्रक प्रकाशन औरंगाबाद*
*6) रा. ग. जाधव साठोत्तरी मराठी कविता व कवि साकते प्रकाशन औरंगाबाद*